# Session : 9

Date : 24/09/25

News : Sanchar

# श्री मल्लिकार्जुन प्रशालेत सायबर सुरक्षिततेवर मार्गदर्शन

तालुका प्रतिनिधी

अक्कलकोट, दि. २३ - डिजिटल युगात सायबर सुरक्षेचे महत्त्व लक्षात घेता किणी येथील श्री मल्लिकार्जुन प्रशालेत विद्यार्थ्यांसाठी सायबर शिक्षण व सायबर सुरक्षा या विषयावर मार्गदर्शन सत्राचे आयोजन करण्यात आले. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या संगणकशास्त्र विभागाच्यावतीने हे मार्गदर्शन करण्यात आले.

संगणकशास्त्र विभागातील विद्यार्थिनी सुश्मिता राठोड आणि श्रुती गणपा यांनी विद्यार्थ्यांना इंटरनेटवरील वाढत्या फसवणुकीच्या प्रकारांविषयी उदाहरणांसह सविस्तर माहिती दिली. मोबाइलवर येणारे ओटीपी कोणालाही सांगू नये, अनोळखी नंबरवरून आलेल्या कॉलवर विश्वास ठेवू नये, व्हॉट्सॲप किंवा इतर सोशल मीडियावरील लिंकवर विचार न करता क्लिक करू नये, पासवर्ड मजबूत ठेवावा, तसेच वैयक्तिक माहिती सुरक्षित ठेवावी अशा अनेक महत्त्वपूर्ण सूचना देण्यात आल्या.

सायबर सुरक्षेबाबत विद्यार्थ्यांनी जागरूक राहणे अत्यंत आवश्यक असल्याचे या मार्गदर्शनात सांगण्यात आले. इंटरनेटचा आणि डिजिटल साधनांचा योग्य वापर केल्यास आयुष्य अधिक सोपे आणि सुरक्षित होऊ शकते. परंतु, चुकीच्या वापरामुळे मोठे आर्थिक व वैयक्तिक नुकसान होऊ शकते, याची जाणीव विद्यार्थ्यांना करून देण्यात आली.

कार्यक्रमासाठी शाळेचे मुख्याध्यापक दिलीप बिराजदार, पर्यवेक्षक फरीद जमादार, सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. शेवटी सहशिक्षक सचिन घोडके यांनी आभार मानून सत्राचा समारोप केला.